लोकमत

# परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार आढळल्यास संचालकासह बैठ्या पथकावरही कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क


**वाशिम :** बारावीच्या परीक्षेला बुधवार, २१ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून, परीक्षा केंद्रांना आकस्मिक भेटी देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अधीनस्थ आठ भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार आढळून आल्यास संबंधित केंद्र संचालकासह रनर, पर्यवेक्षक आणि बैठ्या पथकांवर कारवाई करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी बुधवारी दिले.

जिल्ह्यात ७३ परीक्षा केंद्रांवर बारावीची परीक्षा होत आहे. परीक्षेदरम्यान गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी, केंद्रांना आकस्मिक भेटी देण्यासाठी तसेच परीक्षा संचालनाबाबत निर्णय घेणे सुकर व्हावे, याकरिता जि. प. अधीनस्थ ८ विभाग प्रमुखांचे भरारी पथक गठीत करण्यात आले आहे.

याशिवाय शिक्षण विभागाची ४ भरारी पथके आहेत. परीक्षा केंद्राच्या प्राप्त तक्रारीनुसार तसेच संवेदनशील परीक्षा केंद्रांना भेटी देण्यासाठी दररोज परीक्षेपूर्वी दोन तास व आधी भरारी पथकाची सभा घेणे व कोणत्या तालुक्यातील परीक्षा केंद्रांवर भेटी द्यावयाच्या याबाबत लॉटरी पद्धतीने चिठी टाकून नमूद चिठीतील नावानुसार संबंधित परीक्षा केंद्रांवर भरारी पथकांना भेटी द्याव्या लागणार आहेत. परीक्षा केंद्रात कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी, गैरप्रकार आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देशही सीईओ वाघमारे यांनी दिले आहेत.

## पहिल्या दिवशी ३५१ विद्यार्थी गैरहजर

२१ फेब्रुवारी रोजी जिल्ह्यातील ७३ परीक्षा केंद्रात बारावीचा पहिला पेपर झाला. २०,९७१ विद्यार्थ्यांची परीक्षेसाठी नोंदणी झाली. यापैकी पहिल्या दिवशी २०,६२० विद्यार्थी हजर, तर ३५१ विद्यार्थी गैरहजर राहिले.



## जिल्हाभरात धडकणार भरारी पथक

जिल्हा परिषदेच्या भरारी पथकांना जिल्हाभरात परीक्षा केंद्रांची पाहणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार भरारी पथक पाहणी करणार आहे.



विद्यार्थ्यांनी तणावमुक्त वातावरणात पेपर सोडवावा, परीक्षार्थींनी कोणतीही भीती न बाळगता आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे. कोणीही कॉपीचा अवलंब करू नये. कॉपीमुक्त परीक्षा पार पडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.

- **वैभव वाघमारे**, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., वाशिम